आतां गताध्यायीं सूचित । कथा सुरस आणि अद्भूत ॥
श्रोतां होऊनि दत्तचित्त । ऐकणें साद्यंत ती आतां ॥ ६७ ॥
कथा वर्णिली पूर्वाध्यायीं । तियेहून हीची नवलाई ॥
कैसी मात्र करीत ती साई । श्रोतियां जाईल अनुवादिली ॥ ६८ ॥
परिसतां हीं कथानकें सुरसें । वठतील गुरुवचनाचे ठसे ॥
कर्माकर्म विकर्म निरसे । श्रद्धा बैसे गुरुपायीं ॥ ६९ ॥
सोप्यांतला सोपा उपाय । हृदयीं स्मरावे साईचे पाय ॥
हाचि एक तरणोपाय । माया जाय निरसोनी ॥ ७० ॥
संसारभय बहु उदंड । मायासमुद्भूत हें बंड ॥
कथाश्रवणें होईल दुखंड । जोडेल अखंड आनंद ॥ ७१ ॥
एकदां शिरडींत महामारी । येतां ग्रामस्थ भयभीत अंतरीं ॥
दवंडी पिटिली एकविचारीं । रहदारी सारी बंद केली ॥ ७२ ॥
महामारीचा मोठा दरारा । ग्रामस्थांनीं घेतला भेदरा ॥
परस्थांचा घेती न वारा । व्यवसाय सारा ठेला कीं ॥ ७३ ॥
मरी जोंवरी चाले गावांत । कोणी न करावा बकऱ्याचा घात ॥
गाडी न येऊं द्यावी शिवेंत । नेमें समस्त वर्तावें ॥ ७४ ॥
ग्रामस्थांचा हा दैवभोळेपणा । बाबांच्या मुळीं नावडे मना ॥
तयांच्या मतें या कुकल्पना । अडाणीपणा लोकांचा ॥ ७५ ॥
त्यांनीं तिकडे करावें नियमन । बाबांनीं वरी घालावें विरजण ॥
कैसें कैसें तें करावें श्रवण । सादर मन होउनी ॥ ७६ ॥
ग्रामपंचांचा हा निर्धार । ग्रामस्थ पाळिती साचार ॥
दंड दणें हाच परिहार । नियम लवभार भंगे जों ॥ ७७ ॥
बाबांस नाहीं दंडाचें भय । ते सदा सर्वदा निर्भय ॥
लावोनिया हरिचरणीं लय । सदैव दुर्जय कळिकाळा ॥ ७८ ॥

---

१ भीती २ दुसरे गांवचे लोकांचा. ३ बंद पडला. ४ मरगी.

एकदां एक परगांवचें गाडें । भरलीं जयांत जळाऊं लाकडें ॥
वेशींत येतां पडे सांकडें । जनातें वांकडें लागलें ॥ ७९ ॥
लाकडांची तेथें दुर्मिळता । जाणीव ही ग्रामस्थांचे चित्ता ॥
परी नियमोल्लंघन अनुचितता । तेणें दुश्चित्तता सकळिकां ॥ ८० ॥
गाडीवाल्यावरी ते फिरले । गाडी तयाची परतवूं लागले ॥
हें वर्तमान बाबांस कळलें । येऊनि थडकले ते स्थाना ॥ ८१ ॥
स्वयें राहिले गाडीपुढें । गाडीवाल्यासीं धीर चढे ॥
ग्रामस्थांचा दुराग्रह मोडे । घातलें गाडें वेशींत ॥ ८२ ॥
तेथूनि तें मंडपद्वारीं । आणवूनी रिचविलें मंडपाभीतरीं ॥
चकारशब्द मुखाबाहेरी । कोणाच्या परी निघेना ॥ ८३ ॥
ग्रीष्म शरद्वा हेमंत । ऋतु असो वर्षा वा वसंत ॥
अष्टौप्रहर मशीदींत । धुनी तेवत बाबांची ॥ ८४ ॥
काय बाबांचा निर्धार विचित्र । अग्निहोत्र्याचें अग्निहोत्र ॥
तैशी प्रज्वलित अहोरात्र । धुनी ती पवित्र बाबांची ॥ ८५ ॥
केवळ या धुनीप्रीत्यर्थ । मोळ्या फांट्याच्या विकत घेत ॥
बाबासमोर मंडपांत । ढीग रिचवीत भिंतीशीं ॥ ८६ ॥
साधून बाजारची वेळा । बाबांनीं करावीं लाकडें गोळा ॥
तयावरीही शेजारियांचा डोळा । स्वार्थासि भोळा दुर्लभ ॥ ८७ ॥
बाबा नाहीं चुलीस फाटे । फाट्याविना चूल न पेटे ॥
ऐसें कथिती जें खोटेंनाटें । फाट्यांत वांटे तयांचेही ॥ ८८ ॥
स्वार्थी जन जात्याच द्वाड । सभामंडपा नाहीं कवाड[1] ॥
तेणें तयांसी फावे सवड । गरजू लबाड सारिखे ॥ ८९ ॥
बाबा अत्यंत परोपकारी । काय वर्णावी तयांची थोरी ॥
दिसाया उग्र बाह्यात्कारी । परी अंतरीं अति सौम्य ॥ ९० ॥

---

१ दार.

अगाध तयांचें महिमान। वाणी होऊनि निरभिमान॥
करील तच्चरणाभिवंदन। तरीच अवगाहन करील॥ ९१॥
व्यापूनिया स्थिरचर। उरीं उरला विश्वंभर॥
विचारूनि हें निरंतर। करीना वैर कुणासी॥ ९२॥
तोच भरलासे सर्व सृष्टीं। दाही दिशे पाठीं पोटीं॥
कोणावरीही वक्र दृष्टी। करितां तो कष्टी होतसे॥ ९३॥
अंगीं जरी वैराग्य पूर्ण। स्वयें लोकसंग्रहार्थ आपण॥
करी प्रापंचिकाचें आचरण। द्यावया शिकवण आश्रितां॥ ९४॥
काय या महात्म्याची लीनता। ऐकतां वाटेल आश्चर्य चित्ता॥
दिसून येईल भक्त प्रेमळता। अवतार सार्थकता तयांची॥ ९५॥
अतुल दीनवत्सलता पोटीं। सानेपणाची आवड मोठी॥
प्रत्यंतरास कोट्यानकोटी। येतील गोष्टी सांगावया॥ ९६॥
कधीं ना उपास वा तापास। हटयोगाचाही सायास॥
कधीं न रसासक्तीची आस। अल्पाहारास सेवीतसे॥ ९७॥
जाऊनिया नियमित घरीं। मागे ओली कोरडी भाकरी॥
हीच भिक्षा नित्य मधुकरी। कोड न करी जिव्हेचें॥ ९८॥
पुरवी न रसनेचे लाड। मिष्टान्नाची धरी न होड॥
प्राप्ताप्राप्त धडगोड। त्यांतचि गोड मानी तो॥ ९९॥
ऐसे परी प्राणधारण। करून करी शरीर रक्षण॥
कीं तें ज्ञान मोक्ष साधन। निरभिमान सर्वदां॥ १००॥
निज शांती जयाचें भूषण। कासया त्या माळामंडण॥
नलगे चंदन विभूति चर्चन। ब्रह्मपूर्ण श्रीसाई॥ १०१॥
बोधदायक अति पावन। भक्ति प्राधान्य हें आख्यान॥
श्रवण करिती जे सावधान। विरेल भवभान तयांचें॥ १०२॥

---

१ वाचा; शब्द. २ लहानपणाची. ३ मिळाले तरी वाहवा नाहीं तरी वाहवा.

जंव जंव भावार्थी श्रोता जोडे । तंवतंव साईचें भांडार उघडे ॥
कुतर्काक्लिष्टा न हें आलोडे । भोक्ते भावडे सप्रेम ॥ १०३ ॥
आतां पुढील कथानुसंधान । श्रोतां परिसिल्या एकाग्रमन ॥
आणील प्रेमाचें स्फुरण । आनंद जीवन नयनांतें ॥ १०४ ॥
काय बाबांची चातुर्य रीति । काय तयांची युक्ति प्रयुक्ति ॥
हें वर्म जाणिजे सद्भक्तीं । वक्तोवक्तीं अनुभव ॥ १०५ ॥
हें साईचरित्र पीयूषपान । आदरें करा दत्तावधान ॥
गुरुचरणीं लाऊनि मन । कथानुसंधान लक्षावें ॥ १०६ ॥
ही कथा अपूर्व रससोई । सेवितां श्रोतां न करणें घाई ॥
पदार्थापदार्थाची अपूर्वाई । चाखावी नवलाई यथेष्ट ॥ १०७ ॥
आतां पुरे गाडीची कथा । त्याहून विलक्षण बोकडाची वार्ता ॥
आश्चर्य वाटेल श्रोतियां चित्ता । गुरूभक्तां आनंद ॥ १०८ ॥
एकदां एक वर्तलें कौतुक । कोणीसा आणिला बोकड एक ॥
आसन्नमरण दुर्बल देख । आले लोक पहावया ॥ १०९ ॥
जया न कोणी मालक वाली । तया सांभाळी साई माउली ॥
सडलीं पडलीं आणि कावलीं । तीं विसावलीं मशीदींत ॥ ११० ॥
मग तेथेंच तयेवेळीं । बडे बाबा होते जवळी ॥
बाबा म्हणती दे त्या बळी । निर्दाळी एका प्रहारें ॥ १११ ॥
बडेबाबांची काय महती । बसाया स्थान उजवे हातीं ॥
बडेबाबांनीं ओढिल्यावरती । चिलिम सेविती मग बाबा ॥ ११२ ॥
ज्या बडेबाबांवांचून । हालत नसें बाबांचें पान ॥
ज्यानें न करितां ग्रास सेवन । न चले जेवण बाबांना ॥ ११३ ॥
एकदां दिपवाळीसारखा सण । ताटें पक्वान्नें वाढिलीं पूर्ण ॥
पंगत होतां निजस्थानापन्न । गेले रुसोन बडेबाबा ॥ ११४ ॥

---

१ आकळे, साध्य होई. २ अमृत सेवन. ३ रसोई, भोजन. ४ मरावयास टेकलेला. ५ मार. ६ फटक्यास.

बडेबाबा नसतां पंक्तीं । साईबाबा अन्न न सेविती ॥
आणि साईबाबाच जंव ग्रास न घेती । इतर जेवती कैसेनीं ॥११५॥
तेणें सर्वच खोळंबलें । बडे बाबांस शोधून आणिलें ॥
मग जेव्हां पंक्तीस बैसविलें । अन्न सेविलें बाबांनीं ॥ ११६ ॥
आतां सोडून वर्तमान कथा । बडेबाबांची दिग्दर्शन वार्ता ॥
परिसवावी वाटे श्रोतां । आडकथा ही न गणावी ॥ ११७ ॥
बडे बाबा बाबांचे अतिथी । सभामंडपीं जेवणवक्तीं ॥
वाट पहात खालीं बैसती । कान लाविती हांकेला ॥ ११८ ॥
दोन बाजूस दोन पंक्ति । मध्यभागीं बाबा विराजती ॥
बडे बाबांची जागा रिती । वामहस्तीं बाबांचे ॥ ११९ ॥
नैवेद्य सकळ ताटांत पडतां । तीं ताटें पंक्तींत मांडितां ॥
जेवणार निजस्थानीं बसतां । समय येतां भोजनाचा ॥ १२० ॥
बाबा मग परम आदरें । स्वयें पुकारितां तारस्वरें[1] ॥
'बडे मिया' म्हणतां त्वरें । नमनपुरःसर वर येती ॥ १२१ ॥
अन्नावरी जो निष्कारण रुसला । तयाचा तो आदर कसला ॥
जेणें अन्नाचा अपमान केला । तयाचा सन्मान कां इतुका ॥ १२२ ॥
तरी हेही लोकसंग्रह रीती । बाबा स्वयें आचरून दाविती ॥
पंक्तीस घेतल्यावांचून अतिथी । अन्न सेविती अयुक्त तें ॥ १२३ ॥
ही जी गृहस्थ क्रममर्यादा । बाबा न उल्लंघिती कदा ॥
जेणें टळतील भक्तांच्या आपदा । आचरती सदां स्वयेंही ॥ १२४ ॥
अतिथीपूजनें इष्ट प्राप्ति । तेणें होय अनिष्ट निवृत्ति ॥
तैसें न करितां प्रत्यवाय निश्चिती । म्हणोनि पूजिती शिष्ट तयां॥१२५॥
अतिथी रहातां अशनविहीन । पशु पुत्र धन धान्य विनाशन ॥
अतिथीस पडतां उपोषण । आमंत्रण तें अनर्था ॥ १२६ ॥

१ उंच स्वरानें.

तयांस प्रत्यही साईसमर्थ । रुपये पन्नास दक्षणा देत ॥
तयास बोळवीत पाउलें एकशत । बाबा जात स्वयें कीं ॥ १२७ ॥
त्या बडेबाबांवर जेव्हां आली । त्या बोकडाची प्रथम पाळी ॥
' कैसा बे काटना इसकू खाली ' । सबब निघाली मुखावाटे ॥१२८
माधवराव होते तेथें । बाबा आज्ञापिती तयांतें ॥
शामा तूं तरी आण जा सुरीतें । कापूं बोकडातें जा आतां ॥ १२९॥
माधवराव भक्त निधडे । राधाकृष्णाबाईकडे ॥
जाऊनि आणिला सुरा तिकडे । ठेविती पुढें बाबांचे ॥ १३० ॥
जरी तो सुरा आणावयास । माधवरावांस पडले सायास ॥
सुरीवजा पाहूनि तयास । येईना मनास बाबांच्या ॥ १३१ ॥
इतक्यां यता वार्तेची कुणकुण । राधाकृष्णेच्या कानीं पडून ॥
सुरा माघारा घेतला मागवून । दया उपजून अंतरीं ॥ १३२ ॥
मग माधवराव झाले जाते । आणीक सुरा आणावयातें ॥
ते तिकडेच वाड्यांत जाहले बैसते । कीं न घडो हस्तें ती हत्या॥१३३॥
मग काकांचें पहावया मानस । बाबा तंव आज्ञापिती तयांस ॥
जा तूं सुरा आण कापावयास । निर्मुक्त[1] सायास करीं त्यां[2] ॥१३४॥
काका बावनकसी सुवर्ण । बाबांस जरी ठावें पूर्ण ॥
तथापि तें ताविल्यावांचून । निवती न नयन जनांचें ॥ १३५ ॥
तें चोख आहे कीं हिणकस । परीक्षा न करितां जन चोकस ॥
घेती न लावितां सुलाख वा कानस।धरिती न विश्वास बोलाचा॥१३६॥
लाधाया हिऱ्यास निजवैभव । सोसूं लागती घणाचे घाव ॥
फुकाची न देवकळा गौरव । टाकीचे घाव न साहतां ॥ १३७ ॥
काका जरी गळ्यांतील ताईत । इतरांस कैसी यावी प्रचीत ॥
हिराही बांधोनि सूत । पारखी अग्नींत टाकिती ॥ १३८ ॥

---

१ जो वेदनांपासून मुक्त झाला असा. २ त्या बोकडास.

संतवचनीं धरितां विकल्प । अयशस्वी तयाचे संकल्प ॥
निःसत्व निर्फळ वाग्जल्प । परमार्थ अल्पही साधेना ॥ १३९ ॥
वंद्य मानी जो गुरु वचनार्थ । सफल तयाचा स्वार्थ परमार्थ॥
देखे जो दोष कुटिलता तेथ । अधःपात पावे तो ॥ १४० ॥
गुरुसेवेसी जो तत्पर । गुर्वाज्ञेचाच ज्या आदर ॥
इष्टानिष्टतेचा सर्व विचार । गुरुशिरावर तो ठेवी ॥ १४१ ॥
गुर्वाज्ञेचा तो किंकर । स्वतंत्र नाहीं तया विचार ॥
नित्य गुरुवचन पालनपर । सारासार देखेना ॥ १४२ ॥
चित्त साईनामस्मरणीं । दृष्टि साईसमर्थ चरणीं ॥
वृत्ती साई ध्यानधारणीं । देह कारणीं साईच्या ॥ १४३ ॥
आज्ञापन आज्ञापालन । उभयांत जातां एक क्षण ॥
तोहि विलंब न होई सहन । हें विलक्षण विंदान ॥ १४४ ॥
दीक्षित विशुद्ध सत्वधीरू । निश्चयाचे महामेरू ॥
बोकड जीवें केवीं मारूं । विचारू ज्या शिवेना ॥ १४५ ॥
निरपराध बोकड मरेल । आत्मा तयाचा तळतळेल ॥
स्वच्छ निजयशही मळेल । आतळेल पाप महा ॥ १४६ ॥
हा विचार नाहींच तेथें । आज्ञाभंग पाप जेथें ॥
आज्ञा परिपालन अवलंबितें । तयापरतें पुण्य ना ॥ १४७ ॥
गुर्वाज्ञा जया प्रमाण । तया विलक्षण चढे स्फुरण ॥
सहज कोमल अंतःकरण । घेऊं प्राण उद्युक्त ॥ १४८ ॥
मग ते साठ्यांचे वाड्यांत गेले । आज्ञेप्रमाणें शस्त्र आणिलें ॥
बोकड मारावया सिद्ध झाले । नाहीं कचरले तिळमात्र ॥ १४९ ॥
गुर्वाज्ञेचें परिपालन । तेंच विरश्रीचें स्फुरण ॥
केलें शस्त्राचें आलंबन । अंतःकरण दृढ केलें ॥ १५० ॥

जन्म निर्मळ ब्राह्मणवंशा । जन्मादारभ्य व्रत अहिंसा ॥
तयावरी हा प्रसंग ऐसा । हात कैसा वाहील ॥ १५१ ॥
गुर्वाज्ञापालनीं लिघडा । केला मनाचा एकदां धडा ॥
परी छाती उडे धडधडां । घाम भडभडा सूटला ॥ १५२ ॥
कायावाचामनें । शब्द महारही जो नेणें ॥
तेणें शस्त्रप्रहार करणें । दुर्घट घटणें तें हेंच ॥ १५३ ॥
गुरुवचना अवमानिती । नाहीं तयांस दुसरी गती ॥
पूर्व पुण्यकर्मा उपहती । जाहली निश्चिती तयांच्या ॥ १५४ ॥
गुर्वनुज्ञा परिपाळण । हेंचि भूषणांमाजीं भूषण ॥
हीच सच्छिष्याची खूण । आज्ञोल्लंघन महत्पाप ॥ १५५ ॥
गुर्वाज्ञेचें एक क्षण । जाऊं न देतां करावें पालन ॥
विचारी चांचरी तो करंटा जाण । विषाणहीन नरपशु ॥ १५६ ॥
तेथें न पाहणें मुहूर्त । शुभाशुभ वा तूर्तातूर्त ॥
तात्काळ आज्ञा मानी तो धूर्त । दीर्घसूत्री दुर्भागी ॥ १५७ ॥
मग कास घालुनी एके हातीं । दुजियानें शस्त्र सांवरिती ॥
अस्तन्या सारीत सारीत येती । अजा होती ते स्थानीं ॥ १५८ ॥
आश्चर्य करिती ग्रामस्थ लोक । हें काय कृत्य अलौलीक ॥
काकाचे मनाची ती कोंवळीक । मावळली कीं कैसेंनी ॥ १५९ ॥
मुसलमान मांसाहारी । तया चडफडत्या अजावरी ॥
फकीरबाबा शस्त्र न धरी । तेथें तयारी काकांची ॥ १६० ॥
वज्राहूनही कठोर । कुसुमाहूनिही कोमलतर ॥
म्हणती असती जे लोकोत्तर । तयांचें अंतर तें खरें ॥ १६१ ॥
मग घट्ट धरोनी सुरा हातें । उंच करोनिया निजकरातें ॥
म्हणती मारूंच कां बाबा यातें । एकदां मातें वदा कीं ॥ १६२ ॥

---

१ नाश

आर्तत्राणार्थ शस्त्रधारण । तेणेंच निरपराध अजहनन ॥
परी गुरुसेवेसी विकिला प्राण । म्हणोन अनमान जीवाला ॥ १६३ ॥
प्राणं जाता धाई धाई । कृपा उपजली तया हृदयीं ॥
सुरा चांचरे मागें जाई । हस्त न होई पुढारा ॥ १६४ ॥
हूं मार आतां काय वघसी । परिसून अखेरची आज्ञा ऐसी ॥
प्रहार करावया आवेशीं । अर्धवर्तुळेसी ते वळले ॥ १६५ ॥
सुऱ्यासहित कर उचलिला । बोकडाचा काळ आला ॥
परी देवची तयाचा राखणवाला । तात्काळ पावला तयाला ॥१६६॥
आतां हा खास करील घाय । ऐसें पाहोनी साई माय ॥
अंत पाहूं जातां अपाय । म्हणे रे जाय राहूं दे ॥ १६७ ॥
हां हां काका होय परता । कायरे तुझी हे निष्ठुरता ॥
ब्राह्मण होऊनी हिंसा करितां । विचार चित्ता नाहीं का ॥ १६८ ॥
ऐसें परिसतां टाकिला सुरा । आश्चर्य वाटलें लहान थोरा ॥
जीवदान लाधला बकरा । गुरूभक्ती शिखरा चढविली ॥ १६९ ॥
मग काका सुरा टाकोन । काय वदती द्या अवधान ॥
बाबा आपुलें अमृत वचन । धर्मशासन तें आम्हां ॥ १७० ॥
आम्हीं नेणूं दुजा धर्म । आम्हां नाहीं लाज शरम ॥
गुरुवचनपालन हेंच वर्म । हाचि आगम[1] आम्हांतें ॥ १७१ ॥
गुर्वाज्ञा परिपालन । हेंच शिष्याचें शिष्यपण ॥
हेंच आम्हा निज भूषण । अवज्ञा दूषण सर्वार्थी ॥ १७२ ॥
होऊं सुखी अथवा कष्टी । परिणामावर नाहीं दृष्टी ॥
घडेल असेल जैसें अदृष्टीं[2] । परमेष्ठीला काळजी ॥ १७३ ॥
आम्हां तों एकची ठावें । आपुलें नाम नित्य आठवावें ॥
स्वरूप नयनीं साठवावें । आज्ञांकित व्हावें अहर्निशीं ॥ १७४ ॥

---

१ वेदशास्त्र. २ नशीबांत.

हिंसा अहिंसा आम्हीं नेणं । आम्हांसी तारक सद्गुरूचरणू ॥
आज्ञा किमर्थ हें मनीं नाणं । प्रतिपालनू कर्तव्य ॥ १७५ ॥
गुर्वाज्ञा जेथ स्पष्ट । युक्तायुक्त वा इष्टानिष्ट ॥
हे विचारी तो शिष्य नष्ट । सेवाभ्रष्ट मी समजें ॥ १७६ ॥
गुर्वाज्ञेचें उल्लंघन । तेंच जीवाचें अधःपतन ॥
गुर्वाज्ञा परिपालन । मुख्य धर्माचरण हें ॥ १७७ ॥
चित्त गुरुपदीं सावधान । राहोत कीं जावोत प्राण ॥
आम्हां गुरूचीच आज्ञा प्रमाण । परिणाम निर्वाण तो जाणे ॥ १७८ ॥
आम्ही नेणों अर्थानर्थ । आम्ही नेणों स्वार्थपरार्थ ॥
जाणूं एक गुरुकार्यार्थ । तोचि परमार्थ आमुतें ॥ १७९ ॥
गुरुवचनाचिया पुढें । विधिनिषेध व्यर्थ वापुडे ॥
लक्ष गुरुनियोग कर्तव्याकडे । शिष्याचें सांकडें गुरुमाथां ॥ १८० ॥
आम्ही आपुल्या आज्ञेचे दास । योग्यायोग्य नाणूं मनास ॥
वेळीं वेचूं जीवितास । परि गुरुवचनास प्रतिपाळूं ॥ १८१ ॥
स्वभावें जें दयाभूत । तेंच मन होय पाषाणवत ॥
म्लेंच्छही न जें करूं धजत । ब्राह्मण सजत करावया ॥ १८२ ॥
वाटेल हें श्रोतियां अवघड । परी हें सद्गुरूवरचें गारूड ॥
व्हा एकदां गुरूवचनारूढ । तात्काळ गूढ उकलेल ॥ १८३ ॥
एकदां त्यांची धरल्या कास । पायीं ठेविल्या पूर्ण विश्वास ॥
मग शिष्याची चिंता तयांस । नलगे सायास करावया ॥ १८४ ॥
सर्वथैव वाहून घ्या पायास । भय नाहीं मग तयास ॥
केवळ तोच तयाचा आत्मविश्वास । परतीरास लाववी ॥ १८५ ॥
त्रिप्रकार शिष्य असती । उत्तम मध्यम अधम वृत्ति ॥
प्रकार प्रत्येकीं अति संकलिती । अभिव्यक्तीस[१] आणितों ॥ १८६ ॥

१ स्पष्टतेस.

न सांगतां अभिष्ट जाणणें । जाणतांच सेवा करूं लागणें ॥
प्रत्यक्ष आज्ञेलागीं न खोळंबणें । जाणे उत्तम शिष्य तो ॥ १८७ ॥
गुरूनें आज्ञापितां मानणें । अक्षरें अक्षर प्रतिपाळणें ॥
कार्यांतरीं न विलंबणें । जाणे मध्यम शिष्य तो ॥ १८८ ॥
गुरूनें आज्ञा करीत राहणें । करूं करूं म्हणतांचि जाणें ॥
प्रतिपदीं प्रमाद करणें । जाणा अधम शिष्य तो ॥ १८९ ॥
परम वैराग्य नाहीं अंतरीं । नित्यानित्य विवेक न करी ॥
कैंची गुरुकृपा तयावरी । जन्म जरी घालविला ॥ १९० ॥
तरी जो गुरुपदीं निरंतर । इच्छा तयाची पुरवी ईश्वर ॥
निश्चळ निष्काम करी सत्वर । तो परात्पर सोईरा ॥ १९१ ॥
असावें निर्मळ श्रद्धाबळ । वरी प्रज्ञेचें बळ प्रबळ ॥
संबूरीची[1] जोड अढळ । परमार्थ सबळ तयाचा ॥ १९२ ॥
येथें नलगे प्राण निरोध । अपानोदान[2] यांचा शोध ॥
हटयोग समाधि वा उद्‌बोध । साधन दुर्बोध तें आम्हां ॥ १९३ ॥
असतां शिष्याची भूमिका तयार । सद्गुरूसिद्धीसीं नाहीं उशीर ॥
ते तों सदैव अनुग्रह तत्पर । एकाचि पायावर उभे ॥ १९४ ॥
सगुण साक्षात्कार प्रतीति । भक्तमात्र तेच अनुभविती ॥
भाविकांना उपजे भक्ति । पाखंड युक्ति इतरांना ॥ १९५ ॥
पुढें मग बाबा काकांस वदती । घे हें टमरेल पाण्याचें हातीं ॥
आतां मी हलाल करितों निश्चिती । देतों सद्गती तयातें ॥ १९६ ॥
आधींच तो बोकड मरणोन्मुख । तेथेंच आहे तक्यानजीक[3] ॥
फकीर बाबांस विचार एक । समयसूचक आठवला ॥ १९७ ॥
घेतला बाबांचा विचार । बोकड मारावा तक्यावर ॥
येणें मिषें करवितांच स्थलांतर । बोकड देहांतर लाधला ॥ १९८ ॥

---

१ हा बाबांचे तोंडचा शब्द आहे. याचा अर्थ धीर. २ अपान उदान या वायुचा ह्मणजे प्राणायामाचा. ३ फकीरलोक बसण्याचें घर.

बोकडाचा मृत्यु अटळ । जाणून चुकले होते सकळ ॥
परी पाहूनि योग्य वेळ । केला हा खेळ बाबांनीं ॥ १९९ ॥

सद्गुरूसी शरण गेले । सद्गुरूरूपचि ते जाहले ॥
सैंधव सिंधुस्नानार्थ रिघालें । तें काय निघालें बाहेरी ॥ २०० ॥

जीव हा या जगाचा भोक्ता । ईश्वर जगद्भोग प्रदाता ॥
परी सद्गुरु एक मोक्षदाता । निजात्मैक्यता निधान ॥ २०१ ॥

कृपा उपजलिया पोटीं । सद्गुरू देतील दिव्य दृष्टी ॥
तेणें मग ही सकल सृष्टी । मावेल दिठीं एकदांची ॥ २०२ ॥

हेमाड साईपायीं शरण । तेथें वाही देहाभिमान ॥
मनीं म्हणे सावधान । बाबा निरभिमान मज ठेवा ॥ २०३ ॥

आतां पुढील अध्यायद्वयीं । श्रद्धाविनोदाचीच रस सोई ॥
करीत कैसे महाराज साई । ती नवलाई परियेसा ॥ २०४ ॥

दिसाया विनोद करमणूक । परी ती अत्यंत बोधदायक ॥
अभ्यासील जो भक्त भाविक । परम सुख पावेल ॥ २०५ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । गुरुभक्त लीलादर्शनं नाम ॥
त्रयोविंशतितमोऽध्यायः

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक

वर्ष २ रें.] मार्गशीर्ष शके १८४६ [अंक ९ वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।।

श्री शंकराचार्य

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

महाभारतांतील अनुवाद ... ... ... [illegible]

स्फुट विषय ... ... ... ... [illegible]

महात्म्यांची बोधवचनें ... ... [illegible]

श्री साईसच्चरित ... ... .. [illegible]


---

## वर्गणीचे दर

वार्षिक टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।= व्ही. पी. नें रु. ३॥=, चालू अंकाची -।=, मागील अंक शिल्लक असल्यास -॥-

## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची छपाई व खर्चवेच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावे असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या स्नेह्यांमधून निदान एक तरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीने कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

## विनंति.

या पुढें श्री साईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.


गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें. बी. बी. रेल्वे.



शिर्डी येथील रामनवमीचे यात्रेचा कांहीं भाग

6-2-12

I got up and attended the Kakad Arti Madhaorao Deshpande said that I would get permission to return home to day, So I went with him and Bamangaonkar to Sayin Saheb at about 7-30 a.m., and Sayin Saheb told us to come again in the afternoon. So we returned and I began the routine of the day I, Upasani, and Bapusaheb Jog read Panchadashi, saw Sayin Maharaj go out and attended the midday Arti. Brahmanandi Bai sang an Arti and a few Padas there. Bapusahib Jog went to-day to Kopargaon to get his pension so the Arti was finished soon After the midday meal. I and Bamangaonkar went to the Musjid. Kakasheb Dixit was there Sayin Saheb said that we might go tomorrow. Madhao Rao Deshpande also came there. Sayin Saheb said that he had been considering long and thinking day and night. All were thieves, but we had to deal with them. He said he prayed to God night and day for their improvement or removal, but God delays and apparently does not approve of the attitude and grant the prayer. He will wait for a month or two and then see, but whether living or dead he will have what he has been praying for. He will not go to Teli or Wani, and never beg of them. People are not good and devoted. They are unsettled in mind and so on. He added that a few friends would gather together, talk divine wisdom, and sit and contemplate. He mentioned a few thousand rupees but I do not remember in what connection he said it. I then returned and we had the Ramayan Puran by Dixit. Later on we went to see him come out for his stroll. He was in a pleased mood Mr. Rajarampant Dixit went away to-day to Khandwa. Upasani Shashtri lost his wife. The sad news came by letter. I, Dixit and Madhaorao went to Upasani, condoled with him and brought him to the

Wada Fakir Baba appears to have asked about my going away and Sayin Baba answered that I told him that I would go tomorrow. When my wife spoke about my going, Sayin Baba said that I did not ask for permission personally so he would not say. I happened to go there soon after and Sayin Baba said that I could not go away without taking five hundred rupees from Dada Bhat and two hundred from some one else and making them all over to him. At night the Wada Arti was a bit late as Bapusaheb Jog had to return from Kopargaon Brahmanandi Bai and Shivananda Shastri did Bhajan So did Bhishma

7-2-12

I got up early, prayed and held our Panchadashi class as usual I did not go to Sayin Maharaj to ask for permission. We saw him go out and I went to the Musjid after he returned. I found that Sayin Maharaj was sitting and in the yard a man was exhibiting tricks taught by him to a monkey. There was also a professional singer and dancer She had a good voice and gave religious songs. Later on came Brahmanandi Bai, her companion Salubai, and Shivanand Shastri They did the Puja and Brahmanandi Bai whom they call Mayisaheb sang very beautifully. Sayin Saheb ordered the Sinhasan &c &c. to be brought and when all was arranged and we stood at our posts Mayisaheb again rendered two songs so excellently that we stood spell-bound. I think Sayin Saheb liked them. Then we did the usual Arti and returned for our midday meal. Mayisaheb and her people fed at my lodgings. After the meal Bamangaonkar and Mayisaheb with all her people went to Sayin Saheb to ask for permission to return. Mayisaheb and Salubai got the permission and went away by cart Shivanand Shastri and Bamangaonkar were detained by Sayin

Maharaj and stayed I lay down and had a good nap. Then Mr Dixit read Ramayan and after it I read Dasabodha by myself We all saw Sayin Saheb have his evening stroll, and after the Wada Arti we attended the Shej Arti. At night Bhishma read Bhagvat and Mr Dixit read Ramayan.

8-2-12

I got up for Kakad Arti and after it began the routine of the day. Narayanrao Bamangaonkar got permission to return. So he had somethings for delivery at Amraoti from my wife and actually left by Tanga Before he started, Ganpatrao, the son of Karbhari of my relation Mutalik of Satara came with the customary presents of sesamum for Tilsankrant. They consist of very artistically made things out of Sugar and Sesamum. Balvant for the first time in these three weeks ventured out as far as the Musjid and put his head on the feet of Sayin Maharaj. He has improved so far. Ganpatrao wishes my son Balvant to go with him to Satara for Rangpanchami I referred him to Sayin Saheb. The midday Arti went on as usual except towards the end when Sayin Saheb exhibited anger We spent the afternoon as usual in Dixit reading Ramayan and I reading to myself Dasbodha. We held our Panchadashi class also in the morning. We saw Sayin Saheb at his evening stroll. One Mr Kulkarni has come here from Bombay. He has a laboratory there where he tests ores &c &c. He said he saw me at Sruat in 1907. We sat talking about old things. At night Bhishma had his Bhajan and Dixit read Ramayan

9-2-12

I got up as usual, prayed, and attended Panchadashi class. During it we saw Sayin Maharaj go out. After finishing the class I went to the Musjid Sayin Baba was in very good mood. The young boy Kishya whom we call Pishya came there as usual. On seeing him Sayin Saheb said that Pishya

was a Rohilla in his previous birth, that he was a very good man, that he prayed long and came as guest to Sayin Saheb's grand father The latter had a sister who used to live separate That Sayin Saheb was a young boy himself then and playfully suggested that the Rohilla should marry her. This was to be, and he did eventually marry her. The Rohilla lived there with his wife for a long time and ultimately went away with her, nobody knew where He died and Sayin Saheb put him into the womb of his present mother. Pisya, he said, would be very fortunate and the protector of thousands The midday Arti passed off as usual. During it Sayin Saheb said something to Shivanand Shastri and made signs. The Shastri unfortunately did not catch their import. Sayin Saheb made signs to Bapusaheb Jog also. Mr. Oke, Pleader of Thana, is here. I asked him to remember me to Baba Gupte and other friends.

10-2-12

I attended Kaked Arti in the morning Ganpatrao obtained permission this morning to go to Satara with my son Balvant Madhaorao Deshpande was with them at the time I, Bapusaheb Jog, Upasani, and Mrs. L Kaulgi, had our Panchadashi class, and after it I went to the Musjid. Sayin Baba was in a very pleasant mood and said that his body had been severed from his legs, that he can raise up the former, but not the latter. He said he had a fight with the Teli, that when he was young he raised money for family purposes and agreed to serve the creditor to repay the debt, but he found he could not work, so he applied marking Nut to his eyes and another irritant (Shar) to his body and become ill. He was laid up for a year, but as soon as he recovered he worked night and day and paid off the debt. He sat talking very pleasantly, but towards the end of the midday Arti, began to exhibit signs of impatience. Mr. Gadre pleader of Nasik is here.

11-2-12

By the time I finished my prayer this morning I found Mr. Gadre up and sat talking with him He got permission to return and went back to Nasik. We saw Sayin Saheb go out and held our Panchadashi class with Upasani, Bapusaheb Jog, Mrs L Kaulgi Mr Lele, who is Revenue Inspector of nasik District, also attended the class He appears a very nice man and Sayin Maharaj likes him much I went to the Musjid as usual after Sayin Baba returned and found many men sitting there. They were mostly strangers Among them was one of Akola Police, who, on seeing me, said that he had resigned his post and had taken service with Govindrao Deshmukh, Barrister of Nagpur. After the midday Arti and meal I lay down for a while and then attended the Puran of Ramayan by Dixit Later on we went to see Sayin Baba at his evening stroll and meeting Mr Lele there stood talking with him In the evening there was the Wada Arti and later on the Shej Arti, Bhishma's recital of Bhagvat and Mr Dixit's Ramayana. Shivanand Shastri did not get permission today to return.

13-2-12

Mr. Dixit read Ramayana instead and then we went to the Musjid Sayin Maharaj gave me Udi as soon as I stepped in. So I exclaimed that it was telling me to go away. Thereupon he said "Who tells you to go? Sit down " Then he sat talking pleasantly and said that the cow now possessed by Mr Dixit belonged originally to Mhalsapati. Then it went to Aurangabad; then to Jalna and has now come back as the property of Mr Dixit. God knows whose property it is. Looking at me he said "nobody, who has firm faith in God wants for anything", My wife and others were there, We all saw him at his evening stroll. Then there was the Wada Arti and later on Shej Arti. At night Bhishma had his Bhajan and Mr Dixit read Ramayana Sayin Baba today both after the midday Arti and after the Shej Arti told me to go to Wada specially calling me by name

14-2-12

I got up early, attended the Kakad Arti and was very much struck by the fact that Sayin Baba, on leaving the chawdi made passes with his short stick towards the East, North and

South Then he proceeded with hard words as usual We held our Panchadashi class as usual, saw Sayin Baba go out and later on went to the Musjid as usual Sayin Baba told two stories One was that there was a traveller who was accosted in the morning by a demon (Rakshasa). The traveller looked upon it as a bad omen, but on proceeding further met two wells the sweet water of which slaked his thirst. When he felt hungry, he met a husbandman who, on the suggeston of his wife, supplied food He saw a field ripe with corn and wished to have Hurda The owner of the field gave it to him. So the traveller felt happy and proceeded merrily smoking In the forest through which he was passing he met a tiger, lost courage, and hid himself in a cave The tiger was very big and wandered about him. Sayin Baba happened to be passing that way, instilled courage into the traveller, got him out and put him on his way, saying " the tiger would not hurt unless you hurt him some way ". The other story was, that Sayin Baba had four brothers, one of whom used to go out, beg, and bring cooked food, bread and corn His wife used to give out just enough for their father and mother, but starved all the brothers. Sayin Baba then got a contract, brought the money home and every one was supplied with food including the well-to-do brother. Later on the brother got leprosy. Every one shunned him. The father turned him out. Then Sayin Baba used to feed him and see to his comforts Ultimetely the brother died The midday Arti passed off as usual and after it we had our food and I had some rest. Shivanand Shastri and Thakur of Vijayadurga went away today The Vyahi of the local master invited all to a meal today. I declined, but all others went. Sayin Baba at the evening stroll asked why I did not go and I told him the truth, that I could not manage two meals in the course of one afternoon. Sayin Baba looked immersed in care, gazed steadily at the East and West, and dismissed us all with the usual words "go to the Wada." At night Bishma had his Bhajan and Dixit read Ramayan.

## रा. रा. कृष्णराव नारायण पळकर उर्फ छोटू भय्यासाहेब राहणार हर्दा यांचें पत्र ता. ९-१०-२४ यांतील उतारा.

हरदास माझे स्नेही रा रा नारायण गोविंद सिंदे मराठे जातीचे आहेत. लहानपणापासून त्याचा व आमचा स्नेह आहे. संवत १९६० चे सालीं म्हणजे इ. स. १९०३ मध्ये ते व मी व रा. सदूभय्या असे मिळून गाणगापूरला गेलो होतो. मजारनिल्हे नारायण गोविंद सिंदे यास सात मुली जाहल्या परंतु मुलगा नव्हता. गाणगापूरला गेल्यावर संगमावर मी त्यांना सांगितले कीं, ' तुम्ही देवाच्या पादुकासमोर उभे राहून प्रार्थना करा कीं, वर्षाच्या आत मला पुत्र झाल्यास मी त्याला येथे चरणावर आणून घालीन.' त्यावर ते मला म्हणाले कीं, 'ठीक आहे.' बसल्याजागींच ते मी सांगितलेले शब्द म्हणू लागले. मी त्याना सांगितले कीं असे नाहीं. पादुकासमोर चला; व मी त्याचा हात धरून त्याना पादुकासमोर नेले व त्यांच्याकडून वर लिहिलेले शब्द म्हणवून नमस्कार घालविला. पुढे हरदास आल्यावर एक वर्षाचे आत त्याना पुत्रप्राप्ती जाहली. त्या नंतर आम्हीं त्यांना सांगितले कीं, आता तुम्ही नवस फेडला पाहिजे. त्यावर आतां जाऊं मग जाऊं असे होत चालले. पुढे समर्थ साईमहाराज यांच्या संबंधाने रा. रा. काकासाहेब दीक्षित यांच्या तोडून लीला ऐकिली व सन १९११ नव्हेंबर मध्ये आम्ही शिरडीस गेलो. जातेवेळीं रा. सिंदे यांचा विचार आमचे बरोबर येण्याचा नव्हता, परंतु गाडीची वेळ होऊन आम्हीं स्टेशनावर जाणार इतक्यात सिंदे आमचेकडे आले व म्हणू लागले कीं मीही आपल्या बरोबर येतो; तो मी त्यांस म्हटले कीं, तुमचा विचार नव्हता मग एकाएकीं कसा ठरला? त्यावर ते म्हणाले कीं, अगोदर बरोबर माझा विचार नव्हता परंतु आतां एकाएकीं मला असे जाहले कीं गेलेच पाहिजे व तावडतोब आपणाकडे आलो. नंतर ते मी व रा. सदूभय्या, नथुभय्या सरमंडळ असे शिरडीस गेलो. दुपारीं चार वाजता शिरडीस पोहोचलो व समर्थांचे दर्शन घेतलें. दुसरे दिवशीं दुपारीं बारा वाजताची आरती जाहली व आम्हीं मशीदींत उभे होतो. इतक्यावर समर्थांनी सिंदे याजकडे पाहून एकदम जरा उग्र दृष्टी करून म्हटले कीं, क्यां फार शेफा-

रलास काय ! तुझ्या नशीबी कुठे मुलगा होता ? हे पोट फाडून मुलगा दिला आहे ( हे पोट फाडून असे म्हणताना स्वतःचे पोट दाखवून ) ज्यास्ती गड-बड व नखरे केल्यास हिसकावून घेईन. माझ्याकडे पाहून मला म्हणाले कीं, का बरे आहेना ! त्यावर सिंदे याच्या डोळ्यात असुवे आलीं व त्यांनी मनो-मय प्रार्थना केली कीं महाराज चुकी जाहली, क्षमा असावी; व तेथून परत आल्यावर थोडया दिवसांनीं कुटुंब व मुलाला नेऊन समर्थाचे चरणावर घातला. परत माझ्याकडे पाहून म्हटले 'का बरे आहेना' ! याचा अर्थ मी असा समजतो कीं, मी रा शिंदे याचा हात धरून त्यांना गाणगापुरास पादुकांसमोर नेऊन त्यांच्याकडून हीं अक्षरें वदविलीं होतीं. हल्लीं सिंदे व त्याचा मुलगा सर्व आनंदात आहेत. व श्री समर्थचरणीं त्याचे फार प्रेम आहे; व हे श्री साईलीलेचे वर्गणीदारही आहेत.

---

हरदा शहरीं श्री. सदाशिव धुंडिराज नाईक उर्फ सदूभय्या यांचे येथे श्री साईबाबा यानीं आपले संस्थान स्थापन करवून कसें घेतले त्याची हकीकत श्री. सदूभय्या कळवितात ती एणे प्रमाणे.

" मला श्रीमंत रा. रा. काकासाहेब दीक्षित याचे पत्र ता. ५ फेब्रुवारी सन १९१५ चे आले. त्यात मजकूर श्री. बाळकरामजी व मुक्ता-रामजी हे उभयता ता. ६ २-१५ ला मुंबईहून निघून रावेरास जाणार. तेथून ता. ८-२-१५ सोमवारीं निघून त्याच दिवशीं सायंकाळीं पाच वाज-ण्याच्या सुमारास हरद्यास पोहचतील. रावेराजवळ दीड मैलावर श्री मुक्ता रामजीचे घर आहे. तेथें श्रीसमर्थ सांईबाबांचा मोठा फोटो आहे. तो आपल्यास नेऊन द्यावा, अशी त्यांना प्रेरणा झाली आहे. आपण सोमवारीं संध्याकाळीं गाडीचे वेळेस स्टेशनावर माहितगार माणूस पाठविण्याची तजवीज करालच. मी त्याहावे असें नाहीं. "

श्री. रा. रा. काकासाहेब यांचे आज्ञेप्रमाणें सोमवारीं ता. ८-२-१५ ला सायंकाळचे गाडीवर मी स्वतः स्टेशनवर गेलो. गाडी आल्यावर लिहि-ल्याप्रमाणे श्री बाळकरामजी व श्री मुक्तारामजी उभयता श्रीसमर्थ बाबांचा

फोटो मध्ये घेऊन बसलेले दिसले. गाडीचे दार उघडून मी आत जाऊन मोठ्या प्रेमाने श्री चरणीं मस्तक ठेवून नंतर उभयतास नमस्कार केला व श्रीसमर्थांचे फोटोस उचलून प्लाटफार्मवर उतरलो. माझे हातीं मोठा फोटो पाहताच मजभोवती प्यासेंजर लोकाची अति गर्दी झाली. मोठ्या प्रयासाने मी प्लाटफार्मचे बाहेर आलो श्रीसमर्थांचा फोटो व उभयता बंधूंसह मी टांग्यात बसून घरीं आलो. ज्या दिवशीं श्रींची स्वारी माझे घरीं आली, तो श्री रामदास नवमीचा दिवस होता. श्रीसमर्थ फोटो पाटावर शाल बिछवून ठेविला. सायकाळीं आरती झाली. आरती समयीं बरीच मंडळी जमली होती. उभयता बंधू श्री बाळकरामजी व मुक्तारामजी याच्या आज्ञेने गुरुवारीं श्रींनी दिलेल्या चरण पादुकावर रुद्राभिषेक करवून श्रीच्या फोटोची पूजा करून तो फोटो सिंहासनावर बसविला. नंतर आरती मंत्रपुष्प मोठ्या थाटानें झाला. नंतर भिक्षुक मंडळीस दक्षणा पेढे प्रसाद देऊन विदा केले. श्रींच्या पादुकावर अभिषेक होत असता श्री मुक्तारामजींनीं पुढच्या ग्यालरीवर चढून घराच्या छप्परावर श्रीचे निशाण लावले. निशाण लावण्याची जागा मोठी अवघड होती. खालीं पडते तर प्राणच गेला असता. सर्व मंडळी पाहतच होती. ते पांच मिनिटात निशाण घरावर उभे करून कसे खालीं आले, काहीं समजले नाहीं. गुरुवारीं ज्यावेळीं इकडे श्री मुक्तारामजींनीं निशाण उभें केले. त्यावेळीं श्री संस्थान शिरडी येथे श्री बाबांचे हात अति दुखूं लागले, व फकीरबाबाकडून दाबवून घेतले. दुसरे दिवशीं शिवरात्र होती म्हणून रविवारीं प्रसाद श्रीबाबांचा झाला. व पुढील सर्व घडलेली हकीकत श्री साईलीलेच्या अंक ११ वर्ष १ यात ता. ६-३-१५ चे पत्राची नक्कल दिलेली आहे, तींत असल्यामुळें तिची पुनरुक्ति करीत नाहीं.

## खांडव्याचे रा. रा. पुरुषोत्तम बिहारीलाल व्यास यांजकडून लिहून आलेलें

मी नोकरीसंबंधाने निरनिराळ्या संस्थानांत म्हणजे बढवाणी, धार, देवास, दतिया येथे बरींच वर्षें घालविली. तेथे असताना श्रीसाईमहाराजांची कीर्ति ऐकत होतो पण त्यावेळीं दर्शनास जाण्यांचा योग आला नाहीं. इसवी

सन १९२२ च्या एप्रिल महिन्यात माझे मित्र रा. रा. हरि सीताराम दीक्षित खाडव्यास आले होते आणि मीही नोकरी पुरी करून खांडव्यास येऊन राहिलो होतो. त्यावेळीं त्याच्या व माझ्या पुष्कळदा भेटी झाल्या आणि महाराजाचे अलौकिक गुण त्याचेकडून कळले त्यावेळीं महाराज देहधारी नव्हते तरी त्याचे समाधीचे दर्शन अवश्य घ्यावे अशी प्रबल उत्कंठा झाली. पण त्यावेळेस माझी शरीरप्रकृति बरीच अस्वस्थ असल्यामुळे जाऊं शकलो नाहीं. तो योग अखेरीस त्याचवर्षी दसऱ्याचेवेळीं म्हणजे महाराजांच्या पुण्यतिथीच्यावेळीं आला. शिर्डीस गेल्यावर अतिआनंद झाला आणि तेव्हापासून वारंवार शिर्डीस जाण्याची इच्छा होऊं लागली आणि तेव्हांपासून तो आजपर्यंत महाराजांचे कृपेकरून प्रत्येक उत्सवाला माझें शिर्डीस जाणे झाले आहे. महाराजानीं मला अनुभवही बरेच दिले आहेत त्यापैकीं कांही येथे नमूद करण्याची परवानगी घेतो:—

१ गतवर्षी म्हणजे शके १८४५ मध्यें आषाढ शुद्धांत मी कच्छ भूजला मुलाला भेटण्यासाठीं खांडव्याहून निघालो, पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मोरवीकडूनच जाणे शक्य होतें. आम्ही दोन दिवस प्रवास करून मोरवीस जाऊन पोहोचलो. तेथे एक रात्र राहावे लागलें. त्या रात्रीं स्वप्नांत एक घोडेस्वार मजकडे आला आणि म्हणाला सरकार स्वारींत दाखल होण्यासाठीं तुम्ही एकदम शिर्डीस जावे असा तुम्हाला हुकूम झाला आहे. जागा झाल्यावर स्वप्न आठवलें इतकेंच नांहीं पण शिर्डीस जाण्याची ओढच लागली; आणि त्याप्रमाणें भूज जवळ होते तरी तिकडे न जातां मुंबईस परत येऊन शिर्डीस येऊन दाखल झालों. दोन दिवसांनीं श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव सुरु झाला आणि त्या उत्सवांत अथपासून इतिपर्यंत हजर होतों. यंदा वैशाखांत भूजला गेलो आणि चारसहा महिने तरी तेथें राहावे असा हेतू होता पण आषाढ महिना लागताच महाराजांनीं फिरून ओढून शिर्डीस नेलें आणि गुरुपौर्णिमेचा उत्सव संपेपर्यंत तेथे ठेविले. गतवर्षीचे गुरुपौर्णिमेनंतर खांडव्यास गेलो त्यावेळीं आमच्या घरांतील एका मुलीला ( बहिणीच्या सुनेला ) महाराजांनीं स्वप्न देऊन माझ्यासाठीं दार उघडण्यास सांगितले.

ही हकीगत या मासिकात पूर्वीच येऊन गेली आहे. ( पहा वर्ष १ अंक ९ महाराजाचे अनुभव पृष्ठ ७३ )

२ मी भूजमध्ये असता आमच्या शेजारीं राहणाऱ्या एका ब्राह्मणाचे मूल अत्यंत आजारी झाले. सर्व औषधोपचार निरर्थक गेले आणि आता मूल वाचत नाहीं असे ज्याला त्याला वाटू लागले. अर्थात त्याची आई अति आक्रोश करूं लागली मग मला महाराजांनीं प्रेरणा केली कीं माझे नावाचा ताईत मुलाला बांध. तेव्हा मी त्या मुलाच्या आईबापाना म्हटले, "तुमची इच्छा असेल तर मी सांईबाबाच्या नावाचा ताईत या मुलास बांधतो" त्यांनीं ती गोष्ट आनंदाने कबूल केली. चमत्कार हा कीं, ताईत बांधल्या-बरोबर मुलाला आराम वाटू लागला आणि तीन चार दिवसात चांगला बरा झाला. आतां तो मुलगा आनंदात आहे.

३ महाराजाच्या नांवाचा ताईत बांधल्याने बऱ्याच मंडळींचीं दुखणीं गेलीं आहेत. मजकडून ताईतद्वारा महाराजांनीं कित्येक लोकांचे हिवताप ( तिजारा, चौथारा वगैरे ) घालविले आहेत. इतकेंच नव्हे तर माझ्या मेहुण्याची गाय तीन चार वेळा धुपावली होती तिला महाराजांच्या नांवाचा ताईत बांधल्यानंतर पुन: गाभण राहिली आणि योग्यवेळीं तिला वासरूं झाले आणि ती बरेच दुधही देऊं लागली. गाय आणि वासरूं दोन्हीही चांगल्या स्थितींत आहेत.

४ खाडव्यास मी ज्या घरांत राहतों तेथे माडीवर महाराजांची तसबीर मी नेऊन ठेविली आहे आणि तेथें रोज पूजा अर्चा व आरति होत असते. मी रात्रीं तेथेच निजतों. एकदां शिर्डीचे माधवराव देशपांडे आमच्या-कडे आले होते. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे ते रात्रीं खाली आंगणात बाजेवर निजले होते. महाराजांचें त्या रात्रीं त्यांना स्वप्नांत दर्शन झाले आणि ते लगबगीनें कोठें जात आहेत असें दिसले. माधवरावानीं विचारले "देवा एवढया लगबगीने कोठे चाललां ?" महाराज म्हणाले, "श्यामा, तुला ठाऊक नाहीं, मी येथे माडीवर राहतों." असेच एकदां महाराजांनीं माझ्या बहिणीच्या सुनेला स्वप्नांत दर्शन दिले आणि म्हणाले, "मला ओळखलेस नाहीं कां ? मी तुमच्या येथें माडीवर असतो."

५ मी खांडव्यास असतांना माडीवर निजत असे तेव्हा माडीवरच्या खिडक्या सगळ्या उघड्या टाकीत असे. मी भूजला गेल्यावर रात्रीं माडीवर कोणी निजत नसल्याने माझ्या बहिणीच्या सुनेने सर्व खिडक्या बंद केल्या सकाळीं येऊन पाहते तो सर्व खिडक्या उघड्या दिसल्या तिला आश्चर्य वाटले. तिने घरांतील सर्व मंडळीस विचारले पण कोणीही खिडक्या आपण उघडल्याचे सांगेना. मग सुनेला वाटले कदाचित खिडक्या बंद केल्या हा आपला समज चुकीचा असेल, त्या रात्रीं तिने पुन: खिडक्या बंद केल्या. सकाळीं पाहते तों खिडक्या पुन: उघड्या. तेव्हां तिची खात्री झाली कीं, हा कांहीं तरी महाराजांचा खेळ आहे आणि त्याना खिडक्या उघड्या हव्या आहेत असे वाटले, आणि तेव्हापासून तिने माडीवरील खिडक्या बंद करावयाचे सोडून दिले.

---

बाहेरगावीं असणाऱ्या माझ्या एका मित्राला सुमारें दोन महिन्यापूर्वी स्वप्न पडले. त्या स्वप्नांत त्याला महाराजाचें दर्शन झाले. त्यावेळीं महाराज त्याला म्हणाले, “ मैं तेरेकू यहांही गाडूंगा ” ( म्ह० मी तुला यथेच पुरून टाकीन ). या स्वप्नामुळे माझा मित्र बराच घाबरला. त्याला त्याचा अर्थ कळेना. त्याने मला अर्थ विचारला. मी म्हटलें, “ मलाही याचा अर्थ कळत नाहीं पण योग्यवेळीं महाराजच उलगडा करतील. ” पुढें सुमारें पंधरा दिवसांनंतर एकाएकीं माझ्या मित्राला मुंबईस बदली झाल्याचा हुकुम आला. मुंबईची बदली माझ्या मित्राला बऱ्याच कारणांनीं अनिष्ट होती म्हणून ती रद्द होण्याचा त्याने प्रयत्न केला आणि तो प्रयत्न महाराजांच्या कृपेने यशस्वी झाला. तेव्हा त्याला अशी स्फूर्ति झाली कीं महाराजांनीं स्वप्नांत उच्चारलेले शब्द हे याच प्रसंगाचे म्हणजे बदली रद्द होऊन तेथेंच राहण्याचे सूचक होते. पुढे एक महिन्याने पुन: बदलीचा हुकुम आला तेव्हां त्याला महाराजांचे वरील शब्द पुन: आठवले आणि जरी दुसऱ्यांदा आलेला बदलीचा हुकुम रद्द होणे सकृद्दर्शनीं दुरापास्त वाटलें तरी आपण प्रयत्न करावा आणि त्यातही आपल्याला महाराज यश देतील असें त्याच्या मनानें घेतलें. त्याचवळेला कांहीं अकल्पित तऱ्हेनें माझ्या मित्राला मदत मिळून तोही प्रयत्न त्याचा सिद्धीस गेला आणि बदलीचा हुकुम फिरून रद्द झाला.

Post Card from Lala Lakhmichand, Dated Delhi 16-11-20 to me:—

"In the night of the 7th His Holiness gave me Darshan at Shirdi While going to office on the 8th I was thinking in my mind that sooner or later I must receive some good news from Shirdi At 11 A. M. the very day I received a half anna cover from Shirdi which contained some प्रसाद of his Holiness. * * * His Holiness though has left us from the visible world yet we are confident that He is still with us and helping us in every way He can as usual. My grand-children who were sick are now hale and hearty by the grace of his Holiness"

Card from Mr V. B. Joshi dated Calcutta 13rd February 1920 to me:—

"I am glad to inform you that by the grace of Baba my baby is improving and the Doctor says he is now out of danger. The day I left Bombay, I am told, he was hopeless but since my arrival here he is very much better No doubt this is the result of Baba's Oodi given by you.

Letter from Mr. J R. Patel dated 410 Chinchpokli Road, Parel 25th March 1918 to me.

"I shall thank you to hand over Rs 20 sent to you, to Sai Baba with my best salams. I have not seen the Sai Baba personally but I have great faith in him. A friend of mine has given me Sai Baba's photo which I am always carrying in my pocket book I must admit that I was not believing in such things before, but since my friend explained to me about Sai Baba and gave me the photo to keep it with me, I must say that the blessings and power of Sai Baba has worked like magic on me because before I was always thinking to harm and fight with my friends and

office brothers and used to think of bad things which are now quite changed."

रा. रा. नरहर लक्ष्मण कुळकर्णी वांबरूड यांचे पत्र–ता. ६-८-२३.

" सर्वांत मला एक आनंदाची गोष्ट समर्थांचे योगाने झाली ती माझे मन फार संतापी होते तें स्थिर साईबाबांनीं केले आहे................ ........समर्थ साईबाबा हे मायबाप व गुरु व देव सर्व तेच आहेत. त्याचा मला मोठा धीर आहे "

Letter from Santappa Nagar Katte dated 3/50 Jawji Buildings Chikhalwadi, Bombay 17th November 1917.

" श्री दत्ताच्या देवस्थानाबद्दल मुंबईच्या रा. रा. तिरकमदास द्वारकादास यांनीं १००० रु० व इतर सद्गृहस्थांनीं मिळून २०० रु० जमा झाले. या शहरांत मी परका मनुष्य असून हे पैसे श्री साईबाबांच्या आशिर्वादानेच मिळाले. हा मजकूर आपल्यास आनंदाने कळवितो. "

काकामासीच-

श्री उद्धवेश बुवांचें पत्र. [illegible] ता० २५–११–१८.

श्रीचे भंडाऱ्याचे वेळेस मला दहानें चातुर्मास असल्यानें येतां आलें नाहीं व तेथे जो प्रकार झाला तो श्रीनें येथेच स्वप्नावस्थेत दाखविल्याने व श्रीची चातुर्मासात सीमा उल्लंघन करूं नये अशी आज्ञा असल्यानें आलों नाहीं...........श्री गुरुरायानें जे स्वप्नीं दाखविलें ते येथे रा. जनुभाऊस व अमळनेरास, पावस्कर यांना श्रीचे तेरावे दिवसाचे आंतच कळविले होते.

Letter from Mr. Cursetji Shapurji dated Grant Road Ahmedally Buildings 3rd floor 14th November 1912 to me.

" Really speaking I was in depressed condition at home on leave and on receipt and handling of Shri's Oodi I have got full vigour and energy of His Blessings

Letter from Mr R. S. Nawalkar B.A., LL.B. dated 14th October 1912 to me;—

"On Sunday last I took the Oodi to my brother in the Asylum. He applied it with his own hand to his forehead and kept the remaining with him. He seems to be alright now but he refuses to go to office. Please lay these facts before Baba."

Extracts from private letters relating experiences about Shri and Shri's Oodi.

Letter dated 9th May 1915 from Mr. Anantrai Bhupatarai Vaishnav of Junagad.

"Let me tell you that your Sadguru's Oodi does an amount of good in critical times. I have preserved it and I do give for use in most difficult hour and it has invariably done good. My son's brother-in law was a few months back seriously ill and he being a pet only male child was a cause of anxiety. But by administering only Oodi the boy is up. Thank Sadguru in these days!"

Letter dated Ashad Shudha 11th from Kakaji Appaji Vaidya of Sapta Shringi Vani to Shri.

"श्री जगदंबेचे आज्ञेनुरूप चरणापाशीं आलों होतो. आपली परवानगी घेऊन पादुकेजवळ निंबवृक्षाखालीं सेवा केली. पुष्कळ दिवसांपासून फार तळमळ होत असे. श्रीगुरुदर्शनाचे योगाने मनास शांतता वाटत आहे. कृपा झाली; आनंद वाटतो."

His letter dated Magh Shudha 8th Shake 1837 to Shri

"...........श्री आज्ञा झाल्यावरून महाराजांचे दर्शनास कार्तिक अखेर येणार होतो. पण मार्गशिर्षापासून येथे प्लेग सुरू झाला. हल्लीं बरा आहे. यावेळीं माझा धाकटा मुलगा व भावाचा नातू याचा पुनर्जन्म झाला. लिहिण्यास अत्यानंद वाटत आहे कीं, या संकटसमयीं श्री समर्थांची स्वारी येऊन धीर देत असे. महाराजांचे वर्णन करण्यास मी अज्ञान असमर्थ आहें.